**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
Estd : 1962
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
NAAC 'A' Grade
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५


जा.क्र. संलग्नता/टी-२/ № 6305 दि. 21 JUN 2019

प्रति,
मा. प्राचार्य,
डॉ. शिवाजीराव कदम कॉलेज ऑफ फार्मसी,
कसबे डिग्रज, मिरज, ता. मिरज, जि. सांगली.

विषय :- आपल्या महाविद्यालयाच्या खालील नवीन अभ्यासक्रम (व्यवसायिक) प्रस्तावाच्या प्राथमिक संलग्नीकरणाबाबत विद्यापीठाची मान्यता.

संदर्भ :- १. आपल्या महाविद्यालयाचे जावक क्र. १०१/२०१८-१९ दि. ०१/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
२. शासन निर्णय क्र. टीईएम-२००९/प्र.क्र.१३०/मशि-४ दिनांक. १० जून, २०१९
३. AICTE :F.No. Western/१-४२५९३१६५७६/२०१९/EOA Date. २९/०४/२०१९
४. Institute on ID PCI - ५७७ Date. April, २०१९

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०१९ पासून खालील संलग्नीकरण प्रकाराचा व अभ्यासक्रमाचा प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाला होता. या प्रस्तावास स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या खालील अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाने पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. शिवाजीराव कदम कॉलेज ऑफ फार्मसी, कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली. | प्राथमिक संलग्नीकरण | प्रवेशक्षमता वाढ बी.फार्मसी ५० वरुन १०० | जून २०१९ पासून एका शैक्षणिक वर्षासाठी |

**स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

1. Professor & Associate Professor be appointed as per requirement.
2. Sport material be purchased as per requirement.

प्राथमिक संलग्नीकरणाची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून दिली असल्याने आपल्या संस्थेने/महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या प्राथमिक संलग्नीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला,

(डॉ. विलास डी. नांदवडेकर)
कुलसचिव

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. सांख्यिकी कक्ष,
७. नॅक विभाग

d:\2019\primary\primary affiliation letter 2019-20.doc

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
Estd : 1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र. : संलग्नता/टी-2/एसआरएस/वि.प.विषय क्र.238, दि. 24 मे, 2019/ No 6193 दि. 19 JUN 2019

प्रति,
मा. प्राचार्य,
**डॉ. शिवाजीराव कदम कॉलेज ऑफ फार्मसी,**
**कसबे-डिग्रज, ता.मिरज, जि.सांगली.**

विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.

संदर्भ : आपला जा. क्र. 80/2018-2019/31/08/2018 dtd. 31/08/2018 रोजीचा प्रस्ताव.

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, 2019 पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. स्थानिक चौकशी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|---|
| 1. | नुतनीकरण | B.Pharmacy Part-I, II & III (50) | जून 2019 पासून एक वर्षासाठी |
| 2. | नैसर्गिक विस्तार | B.Pharmacy. Part – IV (50) | |

**स्थानिक चौकशी समिती/छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

1.Approval of remaining teaching staff should be done through University selection Committee.
2. P.F. Process must be completed.
3. Extra and co-churichlar activity should be initiated.
4. Brooktield viscometes and Rotary Vallum evaporator to be purchased.

टिप : 1. स्थानिक चौकशी समितीने नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालानुसार प्राप्त गुणांकन, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि संबंधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेतर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

...2

2. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.
3. शैक्षणिक वर्ष 2019-20 पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये 65% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016, कलम 120 अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-2 विभाग

प्रत :- 1. पात्रता विभाग, 2. संबंधित परीक्षा विभाग, 3. परीक्षक नियुक्ती विभाग,
4. अभ्यास मंडळे विभाग 5. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग.